**अटी व शर्ती**

१. लिफाफा क्र. १ मध्ये काम क्र. १ ते ३ साठी पुरवठा धारक किंवा उत्पादक यांचे कडील कंपनीचे अधिकृत नेमणुकीची प्रमाणपत्र / संबंधीत वर्गातील नोंदणी प्रमाणपत्र, पॅन कार्ड, जी.एस.टी प्रमाणपत्र, आयटी रिटर्नस मागील ३ वर्षाचे तसेच या स्वरुपातील काम केलेल्याचे सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र किंवा पुर्णत्वाचा दाखला तसेच या बाबतचा आर्किटेक्टचा दाखला जोडणे आवश्यक आहे इत्यादी कागदपत्रे ऑनलाईन सादर करणे बंधनकारक राहील.

२. लिफाफा क्र. १ मध्ये काम क्र ४ व ५ साठी सार्वजनिक बांधकाम विभाग / जिल्हा परिषद यांचे कडील योग्य त्या वर्गातील नोंदणी प्रमाणपत्र, पॅन कार्ड, जी.एस.टी प्रमाणपत्र, आयटी रिटर्नस मागील ३ वर्षाचे तसेच या स्वरुपातील काम केलेल्याचे सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र किंवा पुर्णत्वाचा दाखला तसेच या बाबतचा आर्किटेक्टचा दाखला जोडणे आवश्यक आहे इत्यादी कागदपत्रे ऑनलाईन सादर करणे बंधनकारक राहील.

३. लिफाफा क्र. १ मध्ये काम क्र. ६ साठी सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) यांचे कडील योग्य त्या वर्गातील नोंदणी प्रमाणपत्र, पॅन कार्ड, जी.एस.टी प्रमाणपत्र, आयटी रिटर्नस मागील ३ वर्षाचे तसेच इलेक्टीकचे काम केल्या बाबतचे प्रमाणपत्र किंवा पुर्णत्वाचा दाखला तसेच या बाबतचा आर्किटेक्टचा दाखला जोडणे आवश्यक आहे इत्यादी कागदपत्रे ऑनलाईन सादर करणे बंधनकारक राहील.

४. निविदा फॉर्म फी व बयाणा रक्कम फक्त ऑनलाईन पध्दतीने भरावयाची असून भरण्याची मुदत दिनांक २४/०६ /२०२१ रोजी दुपारी ५.०० पर्यंत राहील. तसेच कंत्राटदाराने ऑनलाईन सादर/अपलोड केलेली लिफाफा क्र. १ मधील सर्व कागदपत्रे, प्रमाणपत्रे संस्थेचे मुख्य कार्यालय जुन्नर येथे दि. २४/०६/२०२१ रोजी दुपारी ५.०० पर्यंत सादर करणे बंधनकारक राहील तसे न केल्यास कोणतीही निविदा उघडण्यात येणार नाही. याची नोंद घ्यावी.

५. कोणतीही अथवा सर्व निविदा, त्यासाठी सर्व कोणतेही कारण न दर्शविता नाकारण्याचा हक्क बाजार समितीने राखून ठेवण्यात आला आहे.

६. करारनाम्यात नमुद केल्याप्रमाणे काम सुरु न केल्यास किंवा काम अर्धवट सोडल्यास ठेकेदाराचे बयाणाअनामत रक्कम जप्त केली जाईल. व काम दुसऱ्या ठेकेदाराकडुन करुन घेण्यात येईल.

७. करारनामा मध्ये नमुद केलेल्या मुदतीत काम पुर्ण न झाल्यास मुदतीबाहेर प्रत्येक दिवसास रक्कम रुपये **५००/-** प्रमाणे दंड आकारला जाईल.

८. सदरचे काम अंदाजपत्रकातील बाबी नुसार पुर्ण करावयाचे आहे. झालेल्या कामाचे बिल काम पुर्ण केल्यानंतर आयकर तसेच इतर शासकीय कर वजा करुन शिल्लक रक्कम अदा केली जाईल.

९. वरील कामावर संस्थेचे आर्कीटेक्ट व संस्थेचे अधिकारी यांना देखरेख करण्याचा अधिकारी राहील. ( त्यांनी दिलेल्या सुचना अंमलात आणाव्यात )

१०. निविदा कामकाजा संबधात म्हणजे निविदा सादर करणे, निविदा संदर्भातील कागदपत्रे सादर करणे, निविदा उघडणे, कामाचा आदेश घेणे, करारनामा करुन देणे, घेणे, बिल सादर करणे, धनादेश स्विकारणे इत्यादीसाठी ठेकेदारास त्यांचे प्रतिनिधी नेमायचे असल्यास रु. १००/- स्टँपपेपरवर सक्षम प्राधिकारी यांचे कडील प्रतिज्ञा पत्र किंवा नोटराईज ॲथोरेटी लेटर सादर करणे आवश्यक राहील.

११. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र. बीडीजी २०१६/प्र.क्र..२/इमा.२ मंत्रालय, मुंबई-४०००३२ दि. १२/०२/२०१६ रोजीचा शासन निर्णयानुसार खालीलप्रमाणे निविदाधारकांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

i) प्राप्त निम्नतम निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा १०% पर्यंत कमी दरंचा असेल तर ठेकेदारांनी निविदाधीन किमतीच्या १% एवढ्या रक्कमेचा धनाकर्ष (Demand Draft) परफॉर्मन्स सिक्युरीटी म्हणून निविदेच्या **लिफाफा क्र. २** मध्ये सादर करावा. ( Scan करुन ई-निविदेसोबत सादर करावा)

ii) प्राप्त निम्नतम निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा १०% पेक्षा जास्त दराने कमी असेल तर देकार १०% पेक्षा जेवढ्या जास्त दराने कमी आहे तेवढ्या रकमेचा व रील बाब २ प्रमाणे येणाऱ्या रकमेसह एकत्रिक धनाकर्ष (Demand Draft) निविदेसोबत **लिफाफा क्र. २ मध्ये सिलबंद करुन सादर करावा.**

iii) धनाकर्ष जमा करणे करीता निविदा धारकांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

अ) धनाकर्ष निविदा बोलविणाऱ्या कृषि उत्पन्न बाजार समिती जुन्नर यांच्या नावे असावा.

ब) धनाकर्ष सरकारी बँका किंवा शेड्युल्ड बँकाकडुन काढलेला असावा.

क) धनाकर्षाची मुदत निविदा भरण्याच्या दिनांकानंतर किमान ३ महिनेपर्यंत असावी.

ड) धनाकर्षाची प्रत Scan करुन ई-निविदा भरताना ठेकेदारांनी अपलोड करावी.

इ) धनाकर्ष सिलबंद लिफाफ्यामधुन कंत्राटदारांनी निविदा स्विकृतीच्या दिनांकापासून ५ (५) working days संस्थेचे मुख्य कार्यालय जुन्नर येथे जमा करावा. लिफाफ्यावर कामाचे नांव व निविदासूचना क्रमांक लिहिण्यात यावा.

फ) धनाकर्षावर बँकेचा MICR व IFSC कोड नंबर असणे आवश्यक आहे.

१२. सदर कामांसाठी निविदा धारकाने स्थळ पाहणी केल्या बाबतचा आर्किटेक्ट / सभापती यांचा दाखला लिफाफा क्र. १ मध्ये जोडणे बंधनकारक राहील.

१३. निविदा धारकाने रु. १००/- च्या स्टॅम्प पेपर वर सत्य प्रतिज्ञा लेख व कागदपत्रे योग्य आहे या बाबतची नोटराईज किंवा ॲफिडेव्हीड सादर करणे बंधनकारक राहील.

| | | |
|---|---|---|
| **ॲड, संजय शिवाजीराव काळे** | **मा. दिलीप मारुती डुंबरे** | **श्री. रुपेश सुभाष कवडे** |
| **सभापती** | **उपसभापती** | **सचिव** |

**कृषी उत्पन्न बाजार समिती, जुन्नर (पुणे)**